# महाराष्ट्र शासन

क्र.मअसे/३७-ए/२०१२/९३४.
दूरध्वनी: २६६७७७७७
फॅक्स : २६६६०२८७
Email : info@mahafireservice.gov.in
Website: www.mahafireservice.gov.in

**महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय,**
महाराष्ट्र अग्निशमन सेवा अकादमी,
विद्यानगरी, हंस भुग्रा मार्ग,
सांताक्रूझ-पूर्व, मुंबई-४०० ०९८.
दिनांक : १३ जून,२०१२.

प्रति,
आयुक्त, सर्व महानगरपालिका,
मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष नियोजन प्राधिकरणे,
मुख्याधिकारी, सर्व नगरपरिषदा,
मुख्य अग्निशमन अधिकारी, सर्व अग्निशमन दले.

विषय : अग्निशमन दलातील **अग्निशामक** पदाच्या नवीन नियुक्तीबाबत.
संदर्भ : शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एफएफएस १६२००३/७०७/ प्र.क्र.७८/२००३/नवि-६, दिनांक २४.०६.२००४.

*महोदय,*

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, विशेष नियोजन प्राधिकरणे, शासकीय उपक्रमे, इत्यादींच्या अग्निशमन दलातील अग्निशामक या पदावर नवीन नियुक्तीसाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी उत्तीर्ण असेल व संबंधीत उमेदवारांनी राज्य शासनाच्या राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा अशी किमान पात्रता शासनाने शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.एफएफएस १६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६, दिनांक २४.०६.२००४ नुसार निश्चित केलेली आहे व त्यानुसार महानगरपालिका, नगरपरिषदा, विशेष नियोजन प्राधिकरणे, शासकीय उपक्रमे इत्यादींनी अग्निशामक पदाच्या सेवा प्रवेश नियमात वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहे.

०२. काही महानगरपालिका, नगरपरिषदा या त्यांच्या अग्निशमन दलातील **अग्निशामक** या पदावर नियुक्ती देताना वरील शासन निर्णयाचे पालन करीत नसल्याचे दिसून येत आहे. म्हणून आपणांस विनंती करण्यात येत आहे की, आपल्या अग्निशमन दलातील **अग्निशामक** या पदाच्या सेवा प्रवेश नियमात वरील शासन निर्णयाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करुन **अग्निशामक** पदावरील नवीन नियुक्तीसाठी उमेदवार हा राज्य शासनाच्या राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण केलेला असावा.

०३. शासन निर्णय, नगर विकास विभाग क्र.एफएफएस १६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६, दिनांक २४.०६.२००४ व हे पत्र www.mahafireservice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

**(एम.व्ही.देशमुख)**
संचालक,
महाराष्ट्र अग्निशमन सेवा

राज्य अग्निशमन केंद्रात सब-ऑफिसर्स पाठयक्रम सुरु करणे व अग्निशमन सेवेतील नवीन नियुक्तीसाठी उमेदवारांची शैक्षणिक पात्रता किमान इयत्ता १० उत्तीर्ण व इतर अटी असणेबाबत..

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग,

शासन निर्णय क्रमांक :एफएफएस १६२००३/७०७/प्र.क्र.७८/२००३/नवि-६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २४ जून, २००४

संदर्भ :-अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्रमांक ३५९/अस/मशा/-२००३/ सीआर-७५, दिनांक १४.०८.२००३

प्रस्तावना :- राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली राज्य अग्निशमन सल्लागार समितीच्या दिनांक ९ मे, २००३ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने व अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन यांच्या वरील पत्रानुसार राज्यातील अग्निशमन सेवेचे कार्य प्रामुख्याने महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे, इत्यादी यांचेमार्फत चालविले जाते. अग्निशमन सेवेतील अग्निशामक पदासाठी सद्या किमान इयत्ता ७ वी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीने व राज्य अग्निशमने सल्लागार समितीने अग्निशामकाच्या सेवेचा दर्जा वाढविण्यासाठी किमान शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण असल्यास अग्निशामकाच्या सब ऑफिसर्स पाठयक्रम प्रवेशाच्या शिफारशी पाठवितांना अडचणी येणार नाहीत . पयार्याने अग्निशामकांची सब-ऑफिसर्स पाठयक्रम पूर्ण केल्याने त्यांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ होवून सेवेचा दर्जा वाढेल व भविष्यातील पद्दोन्नतीपासून ते वंचित राहणार नाहीत. त्यामुळे राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे इत्यादीच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्तीसाठी किमान १० वी उत्तीर्ण व राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक प्रशिक्षण पाठयक्रम पूर्ण करण्याची अट सेवा नियमात अंतर्भूत करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- केंद्रीय गृह मंत्रालयाच्या स्थायी अग्निशमन सल्लागार समितीची शिफारस व राज्य अग्निशमन सल्लागार समितीच्या वरील शिफारशीच्या अनुषंगाने राज्यातील महानगरपालिका/नगरपरिषदा, शासकिय उपक्रमे, इत्यादींच्या अग्निशमन सेवेतील अग्निशामक या पदावरील नवीन नियुक्तीसाठी यापुढे किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता १० वी उत्तीर्ण असेल व संबधित उमेदवारांनी राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचा अग्निशामक पाठयक्रम पूर्ण केलेला असावा. सर्व महानगरपालिका/नगरपरिषदा,

शासकिय उपक्रमे इत्यादींनी अग्निशामक पदाच्या सेवा नियमात वरील आदेशाच्या अनुषंगाने आवश्यक ते बदल करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

म.दि. आडिवरेकर

(म.दि.आडिवरेकर)
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव

प्रति,
अग्निशमन सल्लागार, महाराष्ट्र शासन, राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र, सांताक्रुझ-पूर्व मुंबई
सर्व विभागिय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई-४०० ०२५
आयुक्त, सर्व महानगरपालिका
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा
गृह विभाग,
निवडनस्ती (नवि-६) नगर विकास विभाग